आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI NO. MAHBIL/2011/39044
वर्ष १४ | अंक ६ | सप्टेंबर २०२५ | मूल्य ₹ ५/-

# Grahak Tituka Melwawa
# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत
ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो

## पंचायत पेठ विशेषांक



# ‘ग्राहक भवन’ चा ताबा मागणारा महापालिकेचा मनमानी आदेश रद्दबातल

**– ॲड. शिरीष देशपांडे,** कार्याध्यक्ष

बिल्डर्सच्या तालावर नाचणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांनी ‘ग्राहक भवन’ भूखंडाचा ३१ डिसेंबर २०३० पर्यंतचा असलेला आपला मक्ता करार २०१६ मधे मनमानीपणे एकतर्फी रद्द करून आपल्यालाच आपल्याच वास्तुत ‘ट्रेसपासर’ आणि ‘unauthorised occupant’ ठरवून ‘ग्राहक भवन’ खाली करण्याचा ११ एप्रिल २०२३ रोजी दिलेला मनमानी आदेश सिटी सिव्हील कोर्टाने नुकताच रद्दबातल केला आहे.

‘ग्राहक भवन’ लगतच्या महापालिका मंडईचा पुनर्विकास करण्यासाठी ग्राहक भवनाचा भूखंड सुध्दा बिल्डरला देण्यासाठी २०२१ मधे असाच आदेश महापालिका चौकशी अधिकाऱ्याने महापालिका आयुक्तांच्या वतीने आपणास दिला होता. त्याविरुध्द आपण अपिल केले असता सिटी सिव्हील कोर्टाने त्या आदेशातील तांत्रिक दोष दाखवत फेर-सुनावणी करण्याचा आदेश महापालिकेला दिला होता. परंतू महापालिकेने फेर-सुनावणीचे नाटक करून पुन्हा एकदा आपल्याला आपल्याच हक्काच्या वास्तुत ‘ट्रेसपासर’ आणि ‘unauthorised occupant’ ठरवून ‘ग्राहक भवन’ खाली करण्याचा तोच मनमानी आदेश संस्थेला पुन्हा ११ एप्रिल २०२३ रोजी दिला. त्या विरुध्द केलेल्या अपिलात आता सिटी सिव्हील कोर्टाचे प्रमुख न्यायाधीश श्री. अनिल सुब्रमण्यम यांनी सदर आदेश बेकायदेशीर ठरवून रद्दबातल करत असल्याचे १३ ऑगस्ट २०२५ रोजी घोषित केले आहे हे जाहीर करण्यास मला आनंद होत आहे. आपल्या तर्फे ॲड. निरंजन भडंग, ॲड. वृषाली कबरे आणि ॲड. पूजा जोशी-देशपांडे यांनी गेले ४ वर्षांहून अधिक काळ ही न्यायालयीन लढाई आपल्यातर्फे दोन टप्प्यांत लढवली. त्यांचे मनापासून अभिनंदन आणि आभार.

या सर्व प्रकरणात मला डॉ. अर्चना सबनीस, शर्मिला रानडे, आर्किटेक्टस सर्वश्री जोगळेकर, प्रफुल शहाणे आणि योमेश राव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्या सर्वांना धन्यवाद. आपल्या कार्यालयातील त्यावेळचा अधिकारी अजित गवस तसेच सचिन नाईक यांनी या कामात खुपच मदत केली त्यांचा आवर्जून उल्लेख करणं आवश्यक आहे. तसेच माझे सर्व पदाधिकारी, कार्यकारीणी सदस्य, विश्वस्त श्रीम. ललिता कुळकर्णी, श्री. संजीव मंत्री या सर्वांनी याबाबतीत ही कायदेशीर लढाई लढण्यास जे मनोबल दिले आणि वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.




याबद्दल सविस्तर वृत्तांत निकालपत्र हाती आल्यानंतर पुढील अंकात.

## महत्त्वाची सूचना

मुंबई ग्राहक पंचायतीची सन २०२४-२५ या वर्षाची **वार्षिक सर्वसाधारण सभा** संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळ फोंडके यांच्या अध्यक्षतेखाली **रविवार** दिनांक **२६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३:००** वाजता आयोजित करण्यात आली आहे. सभेची सविस्तर सूचना ‘ ग्राहक तितुका मेळवावा ‘ च्या ऑक्टोबर महिन्याच्या अंकामध्ये छापून येईल. कृपया नोंद घ्यावी आणि हा दिवस राखून ठेवावा.

RNI No. MAHBIL/2011/39044

## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**

डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**

डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**

अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**

ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**

ज्योती मोडक
राजेंद्र राणे
मंगला गाडगीळ
विवेक केळकर
प्रकाश पाटील
आलोक हर्डीकर
कल्पिता रानडे
सुधीर तावरे
शीला देवळेकर
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
शर्मिला रानडे
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
विनायक सोमण (स्वीकृत)

**निमंत्रित**

संघटन विभाग प्रमुख

**पंचायत पेठ समिती**

अनुराधा देशपांडे (अध्यक्षा)

**सदस्य**

अनघा आचरेकर
अलका मोकाशी
उल्का पाटील
जान्हवी नाडकर्णी
प्रिती कोळंबकर
उमा अभ्यंकर
अनघा रेगे
राजेंद्र राणे

# ग्राहक तितुका मेळवावा

## पंचायत पेठ विशेषांक

सप्टेंबर २०२५ | भाद्रपद-आश्विन १९४७

### अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| ‘ग्राहक भवन’ चा ताबा मागणारा महापालिकेचा मनमानी आदेश रद्दबातल | ०२ |
| संपादकीय<br>खरेदीचा उत्सव | ०४ |
| सौंदर्याला पूर्णत्व देतो तो अलंकार! | ०५ |
| शेती व निसर्गाशी नाते सांगणारे दागिने | ११ |
| दागिने नव्या पिढीचे | ११ |
| आधुनिक ट्रेंडी दागिने | १२ |
| ग्राहक पंचायत पेठ चक्र | १४ |
| ग्राहक पंचायत पेठ २०२५ दालन - तक्ता | १८ |
| सेतू बांधा रे | २२ |
| हौसेचे मोल अनमोल | २५ |
| वाचू आनंदे<br>अनुभव, ऋतुरंग, वयम्, अक्षरधन | २६ |
| पालघर येथे ग्राहक पंचायत पेठ उत्साहात संपन्न! | २७ |
| ग्राहक चळवळीला बळ देणारे सर्वोच्च न्यायालयाचे अनोखे भाष्य | २८ |


**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** अनुराधा देशपांडे, नेहा जोशी, सुमिता चितळे
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** रिद्धी नि. पाटील
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# खरेदीचा उत्सव

- अनुराधा देशपांडे,
अध्यक्ष, पंचायत पेठ समिती

ग्राहक पंचायत पेठेचे हे ४७ वे वर्ष. गेली ४६ वर्ष, मधला करोना काळाचा अपवाद वगळता, सातत्याने आयोजित होणारा संस्थेचा हा पंचायत पेठेचा उपक्रम. आमच्या संस्थेला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्यासाठी महत्त्वाचा हातभार लावणारा हा उपक्रम वर्षभरात जवळजवळ १२ ठिकाणी आयोजित केला जातो. ह्या पंचायत पेठांचे दोन टप्पे पार करून गणपती विसर्जनानंतर लागोपाठ ह्या उपक्रमाचा तिसरा टप्पा सुरू होतोय. आपल्या ह्या पंचायत पेठांनी बाजारपेठेत आत्तापर्यंत उचित व्यवहाराची कास धरत स्वतःचे असे वेगळे स्थान नक्कीच निर्माण केले आहे.

बाजारपेठेत सध्या ग्राहक पेठांचे पेव फुटले आहे. कोणत्याही उचित व्यवहाराचा अवलंब न करता केवळ जाहिरातींचा भूलभूलैया, फसवे डिस्काऊंट देत ह्या पेठांचे आयोजन केले जाते. त्यासाठी अगदी 'गिनीज बुक' मध्ये गेल्याचेही दिशाभूल करणारे दावे केले जातात. पण मुंबई ग्राहक पंचायत आयोजित पंचायत पेठांना ह्या फसव्या दाव्यांची गरजच नाही. इथे खरेदी करणारे चोखंदळ ग्राहक आहेत. त्यांना त्यांच्या पैशाचा पुरेपूर मोबदला मिळेल. ह्याची खात्री देणारे आपले गाळेधारक ही आहेत, ह्या दोघांच्या समसमा संयोगातून हा पंचायत पेठांचा वृक्ष बहरत आहे. इथे नाहीत फसवे सेल, नाही किंमतीत घासाघीस, प्रत्येक ग्राहकाला पावती देण्याचे बंधन आहे. आणि काही तक्रार उद्भवली तर तक्रार निवारणाची सोय आहे.

ग्राहक पंचायत पेठांनी समाजाला काय दिले ह्याचा धांडोळा ह्या विशेषांकाच्या निमित्ताने घ्यावासा वाटला. ग्राहक पंचायत पेठा ह्या केवळ खरेदी विक्रीचा व्यवहार करणारा उपक्रम नाही. मुळात मुंबई ग्राहक पंचायत ही ग्राहक चळवळीतील अग्रेसर स्वयंसेवी पंजीकृत ग्राहक संस्था आहे. ह्या संस्थेचा प्रत्येक कार्यकर्ता स्वयंसेवी पध्दतीने कोणतेही मानधन न घेता यथाशक्ती योगदान देतो. जिथे जिथे ग्राहकांची अडवणूक, फसवणूक होते तिथे ग्राहक हितरक्षणासाठी सदैव कार्यरत असणारी ही मुंबई ग्राहक पंचायत. संस्था जे जे उपक्रम हाती घेते त्यात ह्या कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. हे चित्र इतर कोणत्याही व्यावसायिक पेठेत कोणालाही दिसणार नाही. संस्थेच्या ह्या कार्याची नोंद गतवर्षी युनायटेड नेशन्सने घेतली. संस्थेची आर्थिक आत्मनिर्भरता ज्यामुळे आहे त्यात पंचायत पेठांचे योगदान मोठे आहे. त्यामुळे हे कार्य युनायटेड नेशन्सच्या (UNCTAD च्या) संकेत स्थळावर कायमस्वरूपी विराजमान झाले आहे, ह्याचा आम्हा प्रत्येक कार्यकर्त्याला सार्थ अभिमान आहे.




**UNCTAD च्या जागतिक परिषदेमध्ये पंचायत पेठेवर सादरीकरण**

आज सगळे जग डिजिटलायझेशनकडे झपाट्याने झुकतेय. साधी कोथिंबीर घेतली तरी भाजीवाला सांगतो Gpay करा. रिक्षावाला सांगतो Gpay करा. वरवर सुखावणारे असले तरी ह्यांतील धोकेही मोठे आहेत. सायबर क्राईमचा विळखा पडतोय, ऑनलाईन केलेल्या व्यवहारात फसवणूक होतेय. जागतिक पातळीवर ही चिंता भेडसावत असतांना मुंबई ग्राहक पंचायतीने अशा असहाय ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी Online Dispute Redresses चा (ODR) आग्रह धरलाय. ग्राहक मग तो कुठलाही असो देशातला, परदेशातला, गावातला, त्याला न्याय मिळवून देण्यासाठी आग्रह धरलाय. आपले कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे गेली दोन तपे जागतिक स्तरावर ग्राहक हक्क आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी लढत आहेत. त्यांची ODR ची मागणी या वर्षी जुलैच्या 'UNCTAD'च्या परिषदेत जागतिक स्तरावर मान्य झाली. या निर्णयाबद्दल जगातल्या सगळ्या ग्राहक विश्वाने कृतज्ञ रहायला हवे. आपल्या ह्या पंचायत पेठा उचित ग्राहक व्यवहारांचे छोटेसे प्रारूप आहे. इथे ग्राहकांना त्यांच्या हक्कांविषयी जागृत केले जाते. सजग खरेदीचा आग्रह धरला जातो. बाजारपेठेतील अनुचित प्रथांना इथे स्थान नाही.

नवरात्र आणि दीपावली या वर्षातील मोठ्या सणांचे औचित्य साधत दादर, ठाणे, अंधेरी, वसई आणि बोरीवली येथे या पेठांचे आयोजन होत आहे. या सर्व पंचायत पेठांना भेट देण्यासाठी आमच्या चोखंदळ ग्राहकांना आग्रहाचे निमंत्रण.

दसरा आणि दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

# सौंदर्याला पूर्णत्व देतो तो अलंकार!

- डॉ. समिरा गुजर-जोशी
संस्कृत अभ्यासक आणि ज्येष्ठ अभिनेत्री

परवा एका सोहळ्याचे निवेदन करत होते. एक दंततज्ज्ञ मंचावर येऊन त्यांच्या एका नवीन उपक्रमाविषयी माहिती देतील, असे मला सांगण्यात आले. मी त्याप्रमाणे घोषणाही केली. पण त्यांनी जे सांगितले ते ऐकून ऐकणारे सारेच थक्क झाले. त्यांनी सांगितले की आता तुम्हाला तुमचे हसू अलंकृत करून घेता येईल.

नाही कळले ना? मलाही लगेच कळले नव्हते! पण मग उलगडा झाला की म्हणजे एखादा विशेष समारंभ आहे तर तुम्ही दातांना हिरे जडवून घेऊ शकता. तुमच्या ड्रेसला मॅचिंग सेट जसा तुम्ही गळ्यात घालता, तसा आता दातांवरही तो चढवता येईल. मला इतके दिवस 'मोत्यासारखे हसू' हा वाक्प्रचार माहीत होता. पण आता खरंच कोणी हसते आहे आणि दातावर मोती जडवले आहेत, असे दृश्य दिसू शकते. आहे की नाही मजा! लवकरच हा ट्रेंड बाजारात रुळला तर नवल नाही कारण नटण्याची ही मानवी उर्मी फार आदिम आहे. अगदी प्राचीन काळापासून माणूस नटत होता, स्वतःचे शरीर सजवत होता याचे अनेक पुरावे सापडतात.

मला नेहमी वाटते की पहिला दागिना कोणता असेल? एखाद्या आदिम मुलीने पाहिल्यांदा एखादे फूल कानावर ठेवून पाहिले असेल का? तसे फूल ठेवून तिने कदाचित पाण्याच्या शांत पात्रात डोकावून पाहिले असेल आणि खुश झाली असेल का?

धातूंचा शोध लागण्यापूर्वी माणसे पाने, फुले, वेगवेगळ्या प्रकारच्या बिया, दगड, मातीला मण्याचे आकार देऊन, प्राण्यांचे दात, नखे, पिसे, शंख, शिंपले, कवड्या अशा कितीतरी वस्तू वापरून दागिने बनवीत होती. जसजसा धातूंचा शोध लागला तसतसे निरनिराळे अलंकार बनवण्यास सुरुवात झाली. तांबे, लोखंड, सोने, चांदी, रत्ने यांचा शोध लागल्यानंतर त्यांचा वापर अलंकार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर नटण्याने वेगवेगळी रुपे घेतलेली दिसतात. नटण्याच्या ह्या हौसेकडे आणि दागिन्यांच्या इतिहासाकडे एक कटाक्ष टाकावा, त्याचे सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व काय ते पहावे, असा हा प्रयत्न!

दागिने हा कुणाच्या आवडीचा विषय नाही? महिलांच्या तो विशेष आवडीचा आहे, याविषयी तर शंका नाहीच. पण सहसा पुरुषही एखादी चेन, अंगठी, घडयाळ, मनगटावर एखादे कडे, क्वचित कानात एखादा चमकता हिरा किंवा आणखी काही, हे तर सर्रास घालताना दिसतात. म्हणजे या विषयाला उगीच 'बायकांचा विषय' असे लेबल लावण्याचे कारण नाही. तर थेट व्याख्येपासून सुरुवात करूया.



आपण मराठीत दागिना हाच शब्द अधिक वापरतो. 'दाग' या पर्शियन शब्दाचे 'दागिना' हे मराठी रूप आहे. दागचा एक अर्थ 'चिन्ह' असा होतो. शरीरावर मिरवण्याचे चिन्ह या अर्थी हा शब्द आला असावा. दागिन्याला संस्कृतमध्ये अलंकार, भूषण, आभूषण असे शब्द प्रचलित आहेत. अलंकार या शब्दाची संस्कृत व्याख्या फार समर्पक आहे - अलं करोति इति अलंकारः| जो सौंदर्याला पूर्णत्व देतो, तो अलंकार. सौन्दर्यवतीच्या सौंदर्याचा जणू तो पूर्णविराम. शरीराची भूषा म्हणजेच शोभा वाढवतात ती भूषणे किंवा आभूषणे. थोडक्यात दागिने अशी चिन्हे आहेत जी परिधान केल्यावर ती व्यक्ती अधिक सुंदर दिसते. तिचे सौंदर्य अधिकच खुलते. शरीराचे विविध अवयव दगिन्यांनी सजवले जातात. हात, पाय, बाहू, कान, नाक, गळा, कंबर, मस्तक अशा प्रत्येक भागाला उठाव आणण्याकरीता दागिने वापरले जातात. भारतीय संस्कृतीत दागिन्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. एका बाजूला आपली संस्कृती ही आध्यात्मिक प्रगतीसाठी ओळखली जाते हे खरे आहे, पण म्हणून तिला भौतिक सुखाचे वावडे आहे, असे अजिबात नाही.

आता हे सुभाषित पहा ना –

**केयूराणि न भूषयन्ति पुरुषं हारा न चन्द्रोज्ज्वलाः**
**न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः।**
**वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते**
**क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्॥**

याचा अर्थ- बाजूबंद (केयूर) घालून किंवा चंद्राप्रमाणे चमकदार हार घालून माणूस सुंदर दिसत नाही. उटणी लावून, सुगंधी स्नान करून, फुले लेवून किंवा केशरचना करूनही तो सुंदर दिसत नाही. त्याची सुसंस्कारित वाणी हेच त्याचे खरे भूषण होय. इतर सगळी आभूषणे कधीतरी झिजतील, तुटतील. तुमचे गोड बोलणे मात्र कायम तुमच्या व्यक्तिमत्वाचे भूषण ठरेल. हा सल्ला मोलाचा आहे, यात शंका नाही. शेवटी दागिने तुमचे बाह्य सौंदर्य खुलवतात. तुमचे अंतर्गत गुण हे खरे सौंदर्य इथे सांगितले आहे, पण त्याच सुभाषितातून आपल्याला हेही कळते की तेव्हा पुरुष कसे नटत असत. ते बाजूबंद आणि हार घालत असत. केशरचना करत, फुलांचे दागिनेही घालत. थोडक्यात तेव्हाच्या पुरुषांच्या नटण्याच्या पध्दतींचा हा शब्दातून काढलेला फोटो आहे.

सुदैवाने आपल्याला निरनिराळ्या प्राचीन शिल्पांमधून तत्कालीन दागिन्यांचे दर्शन होते, पण त्याच बरोबरीने वाङमयातूनसुध्दा, वरील सुभाषितात मिळते तशी नाना पध्दतीची माहिती मिळते. त्यातून तत्कालीन समाज, त्यांच्या रूढी समजुती या सगळ्यावर प्रकाश पडतो.



चला तर, आता अशी काही उदाहरणेही बघूया. भारतीय दागिन्यांच्या बाबतीत बहुधा सगळ्यात प्राचीन माहिती ही सिंधु संस्कृतीच्या संदर्भात उपलब्ध आहे, असे म्हणावे लागेल. मोहेंजोदडो आणि हडप्पा येथील स्त्री–पुरुष दोघांनाही अलंकारांची हौस दिसून येते. उत्खननात आढळून आले आहे की त्या काळच्या स्त्रिया गळ्यात ताईत बांधत, हारही घालत. दंडात बाजूबंद आणि कानात तुकड्यांसारखी लटकती कर्णभूषणे वापरीत. बांगड्या कोपरापर्यंत भरीत. त्यांच्या कमरेत मेखला, बोटात अंगठ्या आणि पायात तोरड्या असत. त्या काळच्या श्रीमंतांचे दागिने सोने, चांदी आणि मणी यांचे असत. गरीबांचे दागिने तांबे, हाडे व शिंपल्यांचे असत.

या माहितीवरून दोन नवीन मुद्दे लक्षात येतात– एक म्हणजे दगिन्यांवरून तुमचा आर्थिक, सामाजिक स्तर लक्षात येतो. आणि दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दागिने हे केवळ शरीर सजवण्यासाठी नसतात. वर ताइत घातल्याचा उल्लेख आला आहे. अशा प्रकारचे दागिने विशिष्ट हेतूने घातले जातात. जीविताचे संरक्षण व्हावे, देवतांची कृपा व्हावी आणि पिशाच्यांचे किंवा दुष्ट शक्तींचे निराकरण व्हावे म्हणून हे दागिने घातले जातात. दृष्टबाधा, ग्रहबाधा होऊ नये हाही उद्देश असतो. याच हेतूमुळे दागिन्यांमध्ये प्रतीके शिरली आहेत. नाग, कमळ ही प्रतीकेच आहेत. आजही लहान मुलांच्या गळ्यात वाघनख



बांधले जाते, सटवाईचा ताईत बांधला जातो. त्यामागे भावना असते की, ह्या प्रतीकांनी त्या मुलाला संरक्षण मिळावे. काही दागिने अभिमंत्रित करून घातले जातात. संस्कृतीकोशामध्ये महादेव शास्त्री तर सांगतात की, 'सामान्यतः शरीरावरचे सर्व अलंकार हे ताईतवजाच असतात. सौभाग्यचिन्हांचा सगळा वर्ग अशाच प्रकारचा आहे. विवाहित स्त्रीच्या गळ्यात बांधले जाणारे मंगळसूत्रसुध्दा भूषणापेक्षा संरक्षण ह्याच भावनेतून आलेले आहे. लग्नातील अंगठीही मुळात संरक्षक म्हणूनच वधूच्या बोटात घातली गेली.' अशाप्रकारे दगिन्यांचा शरीराला नटवण्याबरोबर हा ही एक महत्त्वाचा उद्देश ध्यानात येतो.

प्राचीन काळातील दागिने असे म्हटले की मला सगळ्यात आधी आठवण होते ती रामायणाची. रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर राम आणि लक्ष्मण तिचा शोध घेऊ लागतात. त्यावेळी आकाशमार्गाने जात असताना सीतेने खुणेसाठी म्हणून टाकलेले दागिने त्यांना

सापडतात. हे दागिने सीतेचेच आहेत ना, याची खात्री करून घेण्यासाठी विचारल्यावर लक्ष्मणाने दिलेले उत्तर कायम लक्षात राहणारे आहे-

**'न अहं जानामि केयुरे, नाहं जानामि कुण्डले ।**
**नूपुरे तु अभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात् ॥**

हे बाजूबंद आणि ह्या कुंडलांविषयी मी खात्रीने सांगू शकणार नाही. हो पण ही पैंजणे मात्र मला अगदी ओळखीचे आहेत, कारण तिला नमस्कार करताना तिच्या पावलांवर झुकत असताना ही पैंजणे मी रोज पाहिली आहेत.' वहिनीचे आणि दिराचे नाते कसे असते, ह्याची ह्यापेक्षा गोड गोष्ट काय असावी!

रामायणाचा संदर्भ दिलाच आहे तर आणखी काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा या निमित्ताने उल्लेख करावासा वाटतो. लग्नसंस्थेत दागिन्यांना महत्त्वाचे स्थान आहेच. प्राचीन ग्रंथात थेट मंगळसूत्राचा थेट उल्लेख आढळत नाही. रामायणात 'चूडामणि' या केसात घालावयाच्या अलंकाराचा उल्लेख येतो. सीतेने रावणाबरोबर आकाशमार्गाने जाताना इतर सर्व अलंकार खुणेसाठी म्हणून



खाली टाकले पण चूडामणि स्वतःजवळ ठेवला, त्याअर्थी तो सौभाग्यालंकार असावा, असा तर्क केला जातो. तिने अशोकवनात तो चूडामणि आपल्या वस्त्रात लपवून ठेवला होता. हनुमंताची भेट झाल्यावर रामाला भेट झाल्याची काहीतरी खूण पटावी म्हणून तिने तो हनुमंताला दिला असा उल्लेख आहे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्त्रियांना लग्नप्रसंगी किंवा इतर मंगल प्रसंगी भेट म्हणून दिले जाणारे अलंकार अर्थात स्त्रीधन. रामायणात राम, लक्ष्मण, सीता जेव्हा वनवासाला जायला निघतात तेव्हा दशरथ महाराज तिला अनेक अलंकार भेट देतात. सीतेला वनवास व्हावा अशी काही कैकयीची आज्ञा नव्हती आणि रामाचा सीतेच्या स्त्रीधनावर कुणाचा अधिकार नाही, ते तिच्या मालकीचे आहे. हा विचार करून वनवासात त्यांच्याकडे अडीअडचणीला सोय म्हणून हा तोडगा दशरथ महाराजांनी काढलेला दिसतो. म्हणजेच काय तर - हे दागिने नुसते सौंदर्य खुलवणारे, सौभाग्याचे लक्षण ठरणारे असे नव्हते. ते स्त्रीसाठी तिचे 'स्त्रीधन' होते. ह्या स्त्री धनाची मालकी पूर्णपणे स्त्रीकडे असे. अगदीच जर दुष्काळ पडला, घरात कोणी अतिशय आजारी पडले तर अशा अपवादात्मक परिस्थितीत नवऱ्याला स्त्री धनाला हात लावता येई. आजही आपल्या कायद्यानुसार स्त्रीधनाचा हक्क हा स्त्रीकडेच आहे. स्त्रीची आर्थिक सुरक्षितता हा विचार त्याच्या मुळाशी आहे. दागिने म्हणजे नुसती चैन नव्हे, हेही या निमित्ताने लक्षात घ्यायला हवे.

भरतमुनींचे नाट्यशास्त्र हाही ग्रंथ दागिन्यांविषयी माहिती देतो. नाट्यशास्त्रात चतुर्विध अभिनय सांगण्यात आला आहे. त्यामध्ये आहार्य अभिनय म्हणजे पात्राची वेशभूषा याचाही समावेश होतो. त्या अनुषंगाने नाट्यशास्त्रात अलंकार ह्या विषयाची वर्गीकरणासकट माहिती आली आहे. अलंकारांचे वर्गीकरण करताना भरतमुनी लिहितात –

**चतुर्विधं तु विज्ञेयं देहस्याभरण बुधैः |**
**अविध्य बंधनीय प्रक्षेप्यारोप्यके तथा ||**

अलंकार चार प्रकारचे असतात –

**अवेध्य** – म्हणजे शरीर टोचून घेवून घालता येणारे – नाक कान टोचून आपण घालतो ते दागिने, कानातले अलंकार, चमकी, नथ इत्यादी.

**बंधनीय** – जे बांधावे लागतात- उदाहरणार्थ बाजूबंद

**प्रक्षेप्य** – नूपुरासारखे अलंकार जे अवयवाजवळ घालावे लागतात.

**आरोप्य** – गळयात रुळणारे, लोंबणारे हारासारखे अलंकार

एरवी दगिन्यांचे प्रकार म्हटले की ते अवयवानुसार केले जाते. अगदी 'नखशिखांत दगिन्यांनी मढली आहे' असे आपण म्हणतो, तेव्हाही वेगवेगळ्या अवयवांना नटवणारे दागिने आपल्याला अपेक्षित असतात. त्या तुलनेत हे नाट्यशास्त्रात सांगितलेले वर्गीकरण थोडे वेगळ्या प्रकारचे आहे. दागिना कसा घातला जाणार आहे, यावर ते अवलंबून आहे. त्यातही जो अवेध्य प्रकार आहे त्याचे आता आधुनिक काळात किती प्रकार पहायला मिळतात!

आपल्याला नाक, कान टोचणे इतकेच ठाऊक असते. त्यातही कान टोचणे हा तर कर्णवेध नावाचा संस्कार आहे. 'सोनारानेच कान टोचलेले बरे!' असा वाक्प्रचारही आहे. अगदी बारा दिवसाच्या बाळाचे कान टोचणारे कुशल सोनार पाहिले की ह्या वाक्प्रचाराची सार्थकता लक्षात येते. (माझी लेक तर झोपली होती, तिचे कान टोचले तेव्हा. कोवळ्या पानातून सुई जाते तितक्या सहजपणे सोनार दादांनी तिचे कान टोचले. तिची झोप चाळवली सुध्दा नाही. असो.) आजच्या काळात मात्र भुवईजवळ, बेंबीजवळ अशा अनेक ठिकाणी टोचून घेण्याचा प्रघात वाढतो आहे. अवेध्य दागिन्यांचे नवे प्रकार रुळत आहेत.

भरतमुनींनी हाराचे सुध्दा पाच प्रकार सांगितले आहेत. वेष्टित म्हणजे गुंफलेले, वितत म्हणजे पसरणारे, संघात्य म्हणजे ज्यामध्ये काही समूह दिसत आहेत, ग्रंथिम म्हणजे ज्यात गाठी आहेत आणि प्रलंबित म्हणजे लांब रुळणारे हार. इतर दागिन्यांचेही खूप सविस्तर वर्णन नाट्यशास्त्रात येते. नाटकात घालायचे दागिने नकली आणि हलके असावे असेही सांगितले आहे यावरून इमिटेशन ज्वेलरीलाही प्राचीन इतिहास आहे, असे जाणवते. या सगळ्यावरून दागिन्यांचे शास्त्र किती विकसित झाले होते याची कल्पना करता यावी. आज ज्वेलरी डिझाईनचे कोर्स खूप डिमांडमध्ये आहेत. त्यापैकी कुणी याचा अधिक बारकाईने अभ्यास केला तर त्यांना ह्या माहितीचा निश्चितच उपयोग होऊ शकेल.

प्राचीन दगिन्यांचा अंदाज येण्यासाठी एक नजर कालिदासाच्या साहित्यावरही टाकू. चूडामणिचा उल्लेख तोही करतो. शिवाय रत्नजाल, मुक्ताजाल म्हणजे रत्न आणि मोत्यांची डोक्यावरून घातली जाणारी जाळी याचाही उल्लेख आहे. शांताबाई शेळके यांनी 'शालू हिरवा पाचू नि मरवा, वेणी तिपेडि घाला। साजणी बाई येणार साजण माझा' या गीतात 'गोऱ्या भाळी चढवा जाळी नवरत्नांची माला' असे म्हटले आहे, त्याची सहजच आठवण होते.



राजे किरीट म्हणजेच मुकुट घालत असत. एका खास दागिन्याचा उल्लेख कालिदासाने केला आहेच. वेद काळापासून त्याचे उल्लेख आढळतात. हा दागिना म्हणजे गळ्यात घालण्याचा 'निष्क' नावाचा कंठा. नाणी गुंफून हा हार केला जाई. महाराष्ट्रात पुतळी हार प्रसिध्द आहे. सोन्याची किंवा चांदीची नाणी गुंफली आहेत अशी पुतळ्यांची माळ अलिकडेही मुली एथनिक ज्वेलरी म्हणून घालतात, ती परंपरा इतकी प्राचीन म्हणता येईल. त्याचप्रमाणे विठोबाच्या गळ्यात असणाऱ्या वैजयंतीमाळेचा उल्लेखही कालिदासाच्या वाङमयात येतो. (गळा माळा वैजयंती। पुढे गोपाळ नाचती।।)

ह्या माळेचे वर्णन विष्णु पुराणात देखील येते. तिथे सांगितले आहे की ही माळ पंचमहाभूतांचे प्रतीक आहे. त्यामुळे पाच वेगवेगळी रत्ने त्यामध्ये गुंफली जातात. मोती, माणिक, पाचू, नीलम आणि हिरा गुंफून ही अनमोल वैजयंतीमाळा बनते. शिवाय कुंडल, कर्णपुर, मणीकुंडल अशी निरनिराळी कर्ण–आभूषणे सांगितली आहेत. बाजूबंद म्हणजे अंगद किंवा केयूर हे स्त्री–पुरुष दोघेही घालत असत. वलय म्हणजे bracelets किंवा कडी आणि अंगुलीयक किंवा अंगठी सुध्दा स्त्री-पुरुष दोघेही घालत असत. अंगठी शिवाय कालिदासाचे शाकुंतल संभवतच नाही. मेखला अर्थात कंबरपट्टा हाही एक महत्त्वाचा अलंकार होता. पण कालिदास सोन्याच्या, रत्नाच्या दागिन्यांइतकीच पसंती फुलांच्या दागिन्यांनाही देतो.

आता आपल्या मराठमोळ्या दागिन्यांकडे येऊया. कालिदास, बाणभट्ट इत्यादींनी वेगवेगळ्या दगिन्यांचा उल्लेख केला, मात्र नाकात घालायच्या दगिन्यांचा उल्लेख केला नाही. त्यामुळे नासिकाभरणम् म्हणजे नाकात घालायचे नथीसारखे दागिने या संदर्भात मात्र संशोधक थोडेसे बुचकळ्यात पडलेले दिसतात. शरीरावरील सर्व अलंकारांचे वर्णन केले आहे, पण नाकातील कोणत्याही अलंकाराचा उल्लेख त्यांच्या साहित्यात दिसून येत नाही. यावरून प्राचीन काळी नाकात अलंकार घालण्याची प्रथा नव्हती की काय, असा प्रश्न त्यांना पडलेला दिसतो.
या संदर्भात Antiquity of Hindu nose-ornament called Nath हा पी. के. गोडे ह्यांचा लेख वाचण्यासारखा आहे. त्यामध्ये

सांगितले आहे की महानुभाव संप्रदायातील लीळाचरित्रात म्हाळसा देवीचे वर्णन ‘काकणे कळाविया, सोनियांची तानवडे, भवरिया भांगु टिळा, नाकी मोती।’ असे करण्यात आले आहे. त्याअर्थी १३ व्या शतकात तरी नाकातील अलंकारांचे अस्तित्व सिध्द होते. पण



कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षःस्थले कौस्तुभं
नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणुं करे कङ्कणम्।
सर्वाङ्गे हरिचन्दनं सुललितं कण्ठे च मुक्तावलिं
गोपस्त्री परिवेष्टितो विजयते गोपाल चूडामणिः॥

ह्या संस्कृत श्लोकात तर नासाग्रे नावमौक्तिक असा उल्लेख आला आहे. हे आभूषण तर चक्क कृष्णाने म्हणजे पुरुषाने परिधान केले आहे. अनेकदा देवी सरस्वती, पार्वती यांच्या वर्णनात नाकातील अलंकारांचे वर्णन आले आहे, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. तेव्हा साधारणपणे ११ व्या, १२ व्या शतकात नाकातील अलंकार रूढ झाले असावेत, असा तर्क लावता येतो.

वर दिलेल्या वर्णनात म्हाळसा देवीने हातात काकणे म्हणजे बांगड्या, कानात सोन्याचे कानातले (तानवडे) भांगात बिंदी आणि नाकात मोती घातले आहेत. आजही ह्या मराठी दागिन्यांचे अस्तित्व टिकून राहिलेले आहे. डॉ. सरोजिनी बाबर यांनी ‘राही रुक्मिणी’ ह्या लेखात एक जुने स्त्रीगीत दिले आहे. त्यात आध्यात्मिक मार्गावर कोणते अलंकार शोभून दिसतात हे सांगितले आहे. त्या निमित्ताने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण मराठी दागिन्यांची ओळख होईल म्हणून त्यातील काही भाग पाहूया.



श्रवणी अनुभव ही बुगडी।.. कानांनी चांगले अनुभव ऐकणे हेच बुगडी घालण्यासारखे आहे. अखंड परमेश्वराचे ध्यान लागणे... हेच कपाळावरील बिजवर म्हणजे बिंदी आहे.

शांती ठुशी ही विवेक टीका दिसे दिव्य गळा
क्रोधादी पदक जडते फाकिली कळा
अदंभ चिंचपेट्या अहिंसा शोभे बोरमाळा
जितेंद्रियाचे काप कानी दिसे चंद्रकळा
राम चुडा पुढे दम पाटली बोध टिकली भाळा
सत्य पुतळी अनुभव सूते गुंफियली माळा
साक्षात्कार माणिक मोती तेजे झळाळा

मग म्हटले आहे की यम नियम हे तोडे-तोडर आहेत. हे पायात घालायचे पैंजणासारखे अलंकार आहेत. त्याच बरोबर जोडवी, बीचवे, बिरोदी यांचाही उल्लेख आहे. हे पायाच्या बोटात घालायचे अलंकार आहेत. याशिवाय मुद, राखडी अशा काही केसात घालण्याच्या अलंकारांचा उल्लेख येतो. आज ते आपल्याला परिचित नाहीत. आणि या वरील उदाहरणात न आलेले कितीतरी अलंकार आहेतच की जसे की तन्मणि, मोहनमाळ, जवमाळ, शिंदे शाही तोडे... किती नावे घ्यावी. आपली महाराष्ट्राची दागिन्यांची परंपरा समृध्द आहे, हेच खरे.

‘वाडा चिरेबंदी’ या नाटकात एक सुंदर प्रसंग आहे. त्या घरातील मोठी सून एक दिवस रात्री दागिन्यांच्या डब्यातले सगळे अलंकार घालून स्वतःला आरशात पाहते आणि म्हणते की हे दागिने घालून असे वाटते की आपल्या घराण्यातील प्रत्येक स्त्री जणू मला भेटते आहे. त्या आया-बहीणींचा हातच माझ्या अंगावरून फिरतो आहे.
मला वाटतं आपल्या सर्वांच्या मनात पारंपरिक दागिन्यांविषयी ही अशीच भावनिक गुंतवणूक आहे. त्यामुळे किती ही ट्रेंड बदलले तरी ‘जुने ते सोने’ हे किमान दागिन्यांच्या बाबतीत तरी खरे ठरावे. मोजके घातले तरी दागिने हवेतच. म्हणून तर आजही हा एक मोठा उद्योग आहे. म्हणूनच आता शेवटी दागिन्यांकडे उद्योग म्हणूनही पाहूया.

अर्थशास्त्र हा ग्रंथ राज्य कारभार करण्यासाठी मार्गदर्शन करणारा आहे. त्यामध्ये तेव्हाच्या विविध उद्योगांविषयी माहिती देण्यात आली आहे. त्या संदर्भात दागिने कसे घडवले जातात, त्यात भेसळ कशी केली जाते, ती भेसळ कशी ओळखावी, गैरव्यवहार होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी, ह्या सगळ्या विषयी खूप बारीकसारीक गोष्टींचा विचार करून माहिती देण्यात आली आहे-

> "दागिने घडवण्यासाठी सुवर्णाध्यक्ष म्हणजे सोनार नेमावेत. त्यांना वेगवेगळे बसवावे. एकत्र बसवू नये. या जागेला येण्याजाण्यासाठी एकच दार असावे. सोन्याचे दागिने करणारे, मण्याचे आणि जडवाचे काम करणारे, भाता फुंकणारे, झाडलोट करणारे, मूस तयार करणारे असे जे कामगार आहेत, त्यांना आत जाताना आणि बाहेर येताना झडती घेऊन सोडावे. त्यांची कामाची हत्यारे, अर्धवट राहिलेली कामे त्यांनी तिथल्या तिथेच ठेवून द्यावी. दागिने करण्यासाठी घेतलेले सोने, त्याचे चालू असलेले काम याची रोजच्या रोज नोंद घ्यावी. त्यावर सकाळ, संध्याकाळ दोन्ही वेळा कारागीर आणि अधिकारी यांचे शिक्कामोर्तब व्हावे."

या छोट्याशा नोंदीवरूनही तिथे होत असलेले व्यवहार, तत्कालीन सुरक्षा व्यवस्था याचा अंदाज येऊ शकतो.

मोत्याचे दागिने हा पुन्हा एक मोठा उद्योग होता. त्याचीही माहिती दिली आहे. या संदर्भात हारांचे प्रकार सांगितले आहेत. नुसतेच मोती ओवले असतील तर एकावली. तिलाच मध्ये रत्न लावल्यास त्याला सर असे म्हणायचे. ज्यामध्ये १००८ सर असतात तो इंद्रछंद हार होय. १०० सरांचा तो देवछंद. यावरून आपण तेव्हाच्या समृध्दीची कल्पना करू शकतो. ह्यात रत्न परीक्षा कशी करावी, वगैरे बरेच तपशील आहेत.

आणखीही बरेच तपशील आहेत. श्रेष्ठ सोने कोणते हे सांगताना म्हटले आहे की कमळातील परागाच्या वर्णाचे, मऊ, स्निग्ध, नाद रहित, चमकणारे सोने श्रेष्ठ होय. शुध्द सोन्याचा रंग हळदीसारखा असतो, पण त्यात निरनिराळ्या प्रमाणात तांबे मिसळले असता एक ते सोळा प्रकार होतात. अगदी कस पाहण्याचा जो दगड आहे तो कसा असावा ह्या विषयी ही सांगितले आहे. कसोटीच्या दगडावर सोन्याने काढलेली रेघ बोटाने किंवा नखाने घासली असता ती पुसली गेली पाहिजे तर सोने शुध्द. ती पुसताना जर पूड पडली तर सोन्यात लबाडी आहे हे समजावे. या शिवाय धातूच्या खाणीमध्ये धातू कसे संशोधित होतात याचे तपशीलही आहेत. प्राचीन काळातही आपल्याकडे प्रगत उद्योग होते. वैज्ञानिक प्रगतीशिवाय हे शक्य नाही. आज जरी आपण दागिन्यांचे वैभव पाहत असलो तरी ते घडविणाऱ्या उद्योगाचे स्वरूपही आपल्याला ह्या ग्रंथातून कळू शकते, हे लक्षात यावे म्हणून हा संदर्भ दिला.

आजची स्त्री रोजच्या आयुष्यात फार दागिने घालत नाही, हे खरे असले तरी सणासुदीला नटण्याची हौस आजही आहे. काही वेळा तर ह्या दागिन्यांकडे पुरुषसत्ताक परंपरेने स्त्रीच्या हाता – पायात घातलेल्या बेड्या म्हणूनही पाहिले गेले आहे. पण शेवटी नटण्याची प्रवृत्ती टिकून राहिलेली दिसते हेच खरे. भारतातच नव्हे जगभर हेच पहायला मिळते आहे.

संस्कृतमध्ये अलम्\अलं याचा अर्थ 'पुरे\पूर्णत्व' असा होतो. सौंदर्याला पूर्णत्व देतो तो अलंकार, ही व्याख्या आपण लेखाच्या प्रारंभी पाहिलीच आहे. पण दगिन्यांचा हा थाट इतका वैविध्यपूर्ण आहे की त्याविषयी लिहिताना मात्र अलं–पुरे असे म्हणण्याची वेळ आली तरी अजून खूप सांगायचे राहून गेले असेच वाटते आहे. आपल्या परंपरेचे, कारागिरांच्या कौशल्याचे हे तेज असेच स्त्री–पुरूषांचे सौंदर्य खुलवत राहो, ह्या विचारासोबत इथेच थांबूया.





ग्राहक तितुका मेळवावा

# शेती व निसर्गाशी नाते सांगणारे दागिने

- नेहा जोशी

भारत हा शेतीप्रधान देश आहे. दागिने हा संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे शेतीचा आणि निसर्गातील घटकांचा प्रभाव दागिन्यांच्या नावांवर दिसतो. ही पाहा काही दागिन्यांची नावे-



- जोंधळी पोत : ज्वारीच्या टपोऱ्या दाण्यांसारखी असते ही माळ, त्यालाच साजेशा कानातल्या कुड्या असतात, मोत्याच्या आणि सोन्याच्या चांदीच्याही.



- गहू तोडे : तोड्यांवर गव्हाच्या आकारातील नक्षीकाम असते.
- तांदळी हार : तांदळाचे दाणे एकाला एक जोडल्यावर दिसतात, तसा हा नाजूक गळ्यातील हार
- बोरमाळ : टपोऱ्या बोरांसारखी एकपदरी दोनपदरी लांब माळ
- बकुळी हार : बकुळीच्या फुलाच्या माळेसारखा सुंदर हार
- दुर्वा हार : लांब दूर्वांसारखे गवत गुंफल्यासारखा दिसणारा हार



- चिंचपेटी : चिंचेच्या आकड्या प्रमाणे दिसणाऱ्या पेट्या (कप्पे) गुंफलेल्या असतात, म्हणून याला म्हणतात चिंचपेटी
- बदाम पेटी : बदामाच्या आकाराच्या लाल रुबी खड्यात गुंफलेला गळेसर, त्याला वरती मोत्याची लवंग असते.



- नागोत्र : नागाच्या आकाराची वाकी किंवा बाजूबंद
- मासोळ्या : माश्याच्या आकारातील पायातील जोडवी किंवा अशीच अंगठी पण असते.
- सिंहमुखी गोठ किंवा कडे : या प्रकारच्या बांगडीवर सिंहाचे मुख कोरलेले असते.



- वाघनख : गळ्यातल्या साखळीमध्ये वाघनख आकारातील पेंडन्ट घातले जाते.
- पोहेहार : पोह्यांसारख्या दिसणारा नेकलेस

# दागिने नव्या पिढीचे

- श्रुती सोमणी



महिलांची दागिन्यांची हौस सार्वकालिक आहे. दागिन्यांमधील मनमोहक वैविध्य हा सदैव आकर्षणाचा विषय ठरला आहे. दागिने महिलांचे नुसते सौंदर्यच वाढवतात असे नाही तर विशिष्ट प्रकारचे दागिने घातल्याने महिलांच्या आत्मविश्वासातही भर पडते. हल्ली ट्रेंडिंग असणारे सेमिप्रेशियस आणि प्रेशियस स्टोन्स मधील काही दागिने हे महिलांपुरतेच मर्यादित नसून तरुण मुलं आणि पुरुष हे देखील आवडीने वापरतात.

Contemporary Jewellery म्हणजेच 'समकालीन दागिने' हा एक आधुनिक ट्रेंड आहे, जो सध्याच्या काळात डिझाइन केला जातो. चांदीमध्ये अपारंपरिक साहित्याचा, म्हणजे सेमी प्रेशियस स्टोन्सचा वापर करून अमूर्त किंवा असममित (asymetrical) डिझाइन तयार केले जाते.

अम्बर, कोरल, अमेथीस्ट, रोज क्वार्ट्झ, गार्नेट, सीट्रीन, लापीज, पेरी डॉट, ऑनीक्स, लॅब्रोडराईट, मदर ऑफ पर्ल्स, गोमती चक्र अशी मौल्यवान रत्ने, धातू, मणी आणि तत्सम साहित्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून दागिने घडवले जातात. त्यावर सोन्याचा मुलामा चढवल्यास पारंपरिक सोनेरी झळाळीची हौसही थोडक्यात होते. फॅशन ज्वेलरी, कॉर्पोरेट ज्वेलरी म्हणूनही ह्याचा सर्रास वापर करता येतो. पार्टीसाठी, कोणत्याही गेट-टुगेदरसाठी, लग्नातील छोट्या मोठ्या फंक्शन साठी हल्ली ही ज्वेलरी वापरण्याची खूप फॅशन आहे. शिवाय आपल्या वेशभूषेला शोभेल अशा कॉम्बिनेशनमध्ये रास्त दरात बनवूनही मिळतात.

# आधुनिक ट्रेंडी दागिने

- नेहा जोशी

वाढता वाढता वाढे म्हणत सोन्या-चांदीचे भाव गगनाला भिडले. शिवाय वाढलेल्या किंमतीमुळे सोन्या-चांदीचे दागिने घालून वावरण्यातील धोकाही वाढला आहे. पण हौसेला मोल नसते. त्यामुळे अलीकडे कृत्रिम/आर्टीफिशिअल किंवा इमिटेशन /प्रतिरूप दागिन्यांची मागणी वाढलेली आहे. असे झळाळते दागिने अनेक प्रकारचे असतात-



**बेन्टेक्स दागिने :** मागील अनेक वर्षांपासून हा प्रकार लोकप्रिय आहे. अगदी हुबेहूब सोन्यासारखे दिसणारे हे दागिने सर्वत्र मिळतात. पाटल्या, बांगड्या, साखळ्या, मंगळसूत्र, कानातले डूल, गळ्यातील सर असे अनेक. या प्रकारात ब्रास (पितळ) किंवा स्टेनलेस स्टील या धातूंवर सोन्यासारख्या दिसणाऱ्या रासायनिक द्रवांचा मुलामा दिलेला असतो. कालांतराने हे पॉलीश कमी होऊ शकते. म्हणूनच कदाचित 'पितळ उघडे पडले' अशी म्हण प्रचलित झाली असावी.

**ऑक्सिडाइज्ड दागिने :** हे दागिने स्टर्लिंग चांदीचे बनवलेले असतात. स्टर्लिंग चांदी म्हणजे चांदी आणि इतर धातूंचे मिश्रण. जसे की तांबे, जर्मेनियम, जस्त, प्लॅटिनम, सिलिकॉन आणि बोरॉन. ही स्टर्लिंग चांदी शुध्द चांदीपेक्षा मजबूत असते. ऑक्सिडाइज्ड ज्वेलरी बनवण्यासाठी, धातूच्या दागिन्यांवर एक विशिष्ट रासायनिक प्रक्रिया केली जाते. त्यामुळे धातूचा पृष्ठभाग काळा किंवा राखाडी होतो. हा काळपटपणा सिल्व्हरची सल्फरसोबत रिऍक्शन होऊन सिल्व्हर सल्फाइड तयार झाल्यामुळे येतो. या प्रक्रियेमुळे दागिन्यांना एक वेगळा आणि आकर्षक रॉयल विंटेज लुक मिळतो. अनेक पारंपरिक दागिने तन्मणी, नथ, नेकलेस सध्या फॅशनमध्ये आहेत. इंडोवेस्टर्न लूक मध्ये जीन्सवर ऑक्सिडाइज्ड नथ घालून मिरवणे तरुणींमध्ये सध्या 'इन' आहे!



**अँटिक फिनिश दागिने :** अँटिक फिनिश ज्वेलरी म्हणजे, जुन्या दागिन्यांच्या डिझाइनवरून बनवलेले कृत्रिम दागिने. या दागिन्यांवर अँटिक फिनिशचा रंग आणि पोत दिला जातो. हा रंग सोन्यापेक्षा थोडा वेगळा असतो, त्याला थोडा तांबूस किंवा मावळलेल्या सोन्याचा (डल गोल्ड) रंग असतो.



**टेम्पल दागिने :** हे दागिने मंदिरांमधील मूर्ती आणि वास्तुकलेतून प्रेरणा घेऊन बनवले जातात. खासकरून गणपती, राधा-कृष्ण, महालक्ष्मी आणि मंदिरांच्या नक्षीकामाच्या प्रतिकृती या दागिन्यांमध्ये आपल्याला दिसतात. बऱ्याचवेळा या दागिन्यांमध्ये अँटिक पॉलिश केले जाते. सध्या लग्नांमध्ये साऊथ इंडियन लूक किंवा टेम्पल वेडिंग लूक थिम असते. तेव्हा असे दागिने वापरले जातात.





**कुंदन दागिने :** मूलतः कुंदन म्हणजे शुद्ध सोने. सोन्याच्या पत्र्यावर नैसर्गिक खड्यांचे कोरीव काम म्हणजे कुंदन दागिने. खऱ्या दागिन्यांची नक्कल करून कृत्रिम खडे वापरून सुंदर कुंदन दागिने बनविले जातात. शरारा, घागरा यासारख्या कपड्यांवर हे दागिने खुलून दिसतात



**मोत्यांचे दागिने :** मोत्यांच्या दागिन्यांमुळे एक रॉयल लूक मिळतो. हे मोती जॅपनीज किंवा कल्चरड असतात. वेगवेगळे रंग देण्यासाठी त्यांना डाय केले जाते. कृत्रिम खडे (रुबी, पाचू सारखे दिसणारे), पोवळे, अमेरिकन डायमंड्स आणि मोती यांची सांगड घालून चिंचपेटी, बदाम पेटी, लफ्फा, मोत्यांच्या बांगड्या, तोडे बनविले जातात. 'मदर ऑफ पर्ल' नावाचे विविध आकाराचे मोठे मोती असतात. त्यांचे आकार नैसर्गिक असतात. त्यापासून बनवलेले दागिने खूप लोकप्रिय झाले आहेत.

**काचेचे, क्रिस्टल्स, प्लास्टिक मण्यांचे दागिने :** अनेक रंगांत आणि आकारात काचेचे मणी क्रिस्टल्स बनवले जातात. त्याच्यापासून सुंदर कृत्रिम दागिने कारागीर घडवतात. अशा मण्यांच्या माळा जास्त लोकप्रिय आहेत. वेस्टर्न लूकवर या माळा उठून दिसतात. लहान मुलींसाठी पण हा उत्तम पर्याय आहे.

**अमेरिकन डायमंड्स (झिरकॉन) दागिने :** अमेरिकन डायमंड्स



(झिरकॉन) म्हणजे खऱ्या हिऱ्यांची प्रतिकृतीच! पेरिडोट (पोपटी), सोनसळी, आकाशी, लाल चुटुक, अमेथीस्ट (जांभळ्या) असे अनेक रंग यात पाहायला मिळतात. तसेच गोल्ड, सिल्वर आणि रोज पॉलिश अश्या प्रकारात ते बाजारात उपलब्ध आहेत.

**हॅण्डपेन्टेड दागिने :** छोट्या कॅनव्हासवर वेगवेगळ्या प्रकारची चित्रे उदाहरणार्थ नथ, गणपती बाप्पा, कमळ असे आकार काढले जातात आणि मग त्याचे रूपांतर नेकलेसमध्ये करतात. ह्यात अगदी छोटेसे सूप देखील पेन्टिंग साठी वापरले जाते. ज्यांना हटके काही हवे असते, त्यांना असे दागिने जास्त भावतात.



**पेपर क्विलिंग दागिने :** रंगीत पेपरची गुंडाळी करून त्याचे विविध आकार (फुलांच्या पाकळ्या, पाने, गोल, इ.) केले जातात. मग त्याचे कानातले, नेकलेस बनविले जातात.



**क्रोशे (Crochet) दागिने :** रंगीत रेशीम धागे क्रोशे पद्धतीने विणून सुंदर दागिने बनवितात. प्राजक्ताची, गोकर्णाची, चाफ्याची फुले, पाने, डूल असे आकार यांत प्रामुख्याने दिसून येतात.

**कापडी (फॅब्रिक) दागिने :** खण, पैठणी यासारखे पारंपरिक कापड, सुती, सिल्क कापड, त्याला मणी, मोती, ऑक्सिडाइज्ड



पेंडंट्स वापरून कापडी दागिने बनवले जातात. यांचा बेस कार्डबोर्ड किंवा कॅनवासचा असतो. पारंपरिक लूकमध्ये हे दागिने उठावदार होतात.

**टेराकोटा दागिने :** माती भट्टीत भाजून त्या मातीचे दागिने घडवितात. नंतर त्यावर चित्रकाम देखील केले जाते.



**रेझीन आर्ट दागिने :** हल्ली लग्नात अनेक थिम इव्हेंट्स असतात उदा. मेहंदी, संगीत वगैरे. अशा कार्यक्रमांमध्ये अनेक नववधू खऱ्या फुलांची किंवा त्यासारख्या दिसणाऱ्या कृत्रिम फुलांच्या दागिन्यांची ही आकर्षक ज्वेलरी वापरताना दिसतात.

आपल्या मुंबई ग्राहक पंचायत पेठांमध्ये तुम्हाला यातील बहुतांश दागिने प्रकार खरेदी करायला मिळतील. असे ट्रेंडी, हटके दागिने नक्की खरेदी करा.

# ग्राहक पंचायत पेठ २०२५

**सोलरूप** – इकत, कॉटन सिल्क, संबलपुरी, कशिदा वर्क साड्या

**सांची आर्टस्** – हॅण्डक्राफ्टेड विविध वस्तू

**रसिका अलंकार** – मायक्रो गोल्ड प्लेटेड ज्वेलरी

**ज्ञासा ग्लास आर्टिफॅक्टस्** – काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ.

**सदाफुली** – महेश्वरी, चंदेरी, हॅण्ड पेंटेड टसर, कॉटन अॅण्ड सिल्क खण साडी, लिनन इ.

**नवलाई क्रिएशन्स** – चंदेरी, महेश्वरी, इक्कल, अजरख इ. साड्या

**नवनिर्मिती** – शैक्षणिक खेळणी

**कलात्मक** – ज्यूटच्या विविध वस्तू, टी कोस्टर्स इ.

**शुभ्रा कलेक्शन** – साड्या आणि रेडीमेड ब्लाऊज

**श्रीजा एंटरप्रायझेस** – विविध कुर्तीज, २ पीस, ३ पिस, कॉर्ड सेटस्, मिडीज इ.

**युथोपिया** – गाईच्या तुपापासून बनवलेल्या लिपस्टिक्स, फाऊंडेशन क्रीम

**ब्लॉसम अॅण्ड इन्सेंस** – परफ्यूम्स

**अनुयोग इन्सेंस** – विविध प्रकारची अत्तरे, सुगंधी अगरबत्ती

**मयुरा कलेक्शन** – कॉटन टॉप, स्लिव्हलेस टॉप, वनपीस, कुर्तीज इ.

**रोतीक कलेक्शन** – शॉर्ट, ट्युनिक शॉर्टस्, लेडीज शर्ट, जॅकेट, कुर्तीज

**ऊब प्रकल्प** – हस्तकलेच्या गोधड्या बेडींग, पायपुसणे

**हरीओम वूड वर्क्स** – लाकडाच्या विविध कलात्मक वस्तू

**हर्बोरिओ कॉस्मेटीक्स** – सौंदर्य प्रसाधने (हेअर, स्किन केअर)

**अनुराधाज् कलेक्शन** – महेश्वरी, कलमकारी, प्युअर सिल्क ड्रेस मटेरिअल

**वीन आर्ट अँड क्राफ्ट** – कागदापासून बनवलेल्या शोभेच्या वस्तू

**एन्थु फॉर आर्ट** – पेंटींगच्या डेकोरेटिव्ह वस्तू

**निर्मिती एंटरप्रायझेस** – काच व पाइनवुड-संमिश्र उत्पादने

**सारा कलेक्शन** – कॉटन, जयपूर, चंदेरी विविध प्रकारचे कुर्ते

**साई सिध्दी फॅशन्स** – चैद्दिनाद कॉटन, हँड पेंटेड, परीजात, कलमकारी साड्या

**अखंडज्योत** – अखंड तेवणारी ज्योत, टाळ, घंटी, छोटे चौरंग, पाट, वजनदार वस्तू उचलण्यासाठी बेल्ट सेट.

**पिपा क्रिएशन** – विविध आधुनिक फॅशनचे रेडीमेड ब्लाऊज

**शिल्पनिल कलेक्शन** – तांबा, पितळ मूर्ती आणि भांडी, पूजा साहित्य

**आरोहिणी** – स्वेटर्स

**स्मायका होम अॅण्ड हायजीन प्रॉडक्टस्** – बायोडिग्रेडेबल घरगुती साफसफाई उत्पादने

**आर्ट इन संस्कृती** – सेमी प्रेशिअस स्टोन, ग्लास बीड्स, जर्मन सिल्वर ज्वेलरी.

**वंश गार्डन इनोव्हेटीव्हज्** – फोल्डींग चटई

**गेबी क्लिनिंग** – साफसफाईची उत्पादने

**नागपूर स्पेशल** – चादरी, सतरंजी इ.

**नेचर्स वूड लाकडी खेळणी** – सावंतवाडी स्पेशल लाकडी खेळणी

**उद्यमिता** – बचत गटांच्या महिलांनी बनवलेल्या पर्सेस

**महाटेक्स** – महाराष्ट्र हातमाग विणकर संघाची दर्जेदार उत्पादने.

**योटॉईज** – आकर्षक कापडी पुस्तके, खेळणी

**विनय एंटरप्रायझेस** – किचनमधील विविध ग्राहकोपयोगी वस्तू

**आभा कलेक्शन्स** – हॅण्ड अॅप्लीक, हॅण्ड एम्ब्रॉयडरी बेडशीट्स

# ग्राहक पंचायत पेठ २०२५

**सूचना:** रंगीत चित्रे प्रत्यक्ष उत्पादनांची नसून प्रातिनिधिक आहेत

### दिया क्विल्ट
फोन चार्जर, सौंदर्य प्रसाधने, साडी-ब्लाऊज इ. ऑर्गनायझर आकर्षक फोल्डर तसेच रजया इ.



### शीलाताई फूड प्रॉडक्टस्
प्रिझर्व्हेटीव्हज् न वापरलेली उत्पादने. केशर वेलची सिरप, आले लिंबु पाचक इ. आवळ्याची उत्पादने

### आभा एथनिक वेअर
लाँग, शॉर्ट कुर्तीज्, वनपिस, शर्ट, स्कर्ट

### महावीर ट्रेडर्स/क्रोकरी
फॅन्सी क्रोकरी, बनीयन्स्, सॉक्स, रुमाल इ.

### नारी बुटिक
शॉर्ट अॅण्ड लाँग कुर्ती (बाघरू व दाबू प्रिंटस) स्त्रिया व पुरुषांसाठी



### बियाँड फ्रेम्स
सुकलेल्या पानांफुलापासून बनवलेल्या शोभिवंत फ्रेम्स



### जान्हवी आर्टस
फ्रिज मॅगनेटस्

### कर्णिक कृषी उद्योग
गुलकंद तसेच शेजवान सॉस, हार्टीका चटणी



### निद्रा क्रिएशन्स
मेंढीच्या लोकरीपासून बनवलेल्या गाद्या

### उर्जा गिफ्टस
विविध प्रकारच्या फॅब्रिकच्या बॅग्ज

### देसाई आर्ट
मातीच्या पेंटिंग केलेल्या शोभेच्या वस्तू

### एस.के. एंटरप्रायझेस
फोल्डिंग टेबल, इतर फर्निचर



### उलुका बॅग
टोट बॅग्ज, वॉलेट

### प्रथम डेकॉर
कॅन्डल स्टॅन्डस्



### व्होवन थ्रेड (लिमाया)
कॉटन, मल कॉटन, ड्रेस मटेरिअल, कुर्ती, पॅण्ट सेट



### चेतना स्टील
स्टील भांडी व उपकरणे

### महालक्ष्मी एंटरप्रायझेस
चमचे, सुऱ्या, पळ्या, किसणी, पोळपाट लाटणे इत्यादी

### टायनी गिगल्स
लहान मुलांचे कपडे



### प्रव आर्टस्
लिप्पन आर्ट वॉलपिस, वूडन कि होल्डर इ. शोभेच्या वस्तू

### हनीबंस
सर्व प्रकारचे मध

### पोशिंदा न्यूट्रिशनल प्रॉ.
विविध प्रकारचे मध

### श्री विनायक एंटरप्रायझेस
साफसफाईसाठी लागणारे विविध ब्रश, स्पंज इत्यादी

### फॅशन क्युरा ज्वेलरी
टेरा-कोटा ज्वेलरी



### पल्लवी कव्हर्स
सोफा, फ्रीज हॅंडल टॉप, मिक्सर, साडी इ.चे कव्हर्स



### दीपक रंगोली
विविध डिझाईनचे रांगोळीचे साचे

### श्री महालक्ष्मी आर्टस्
पारंपरिक व अॅण्टिक ज्वेलरी



### पुलगम सोलापूर चादरी
चादरी, पंचे, गालीचा, दोहर, बेडशीटस् इ.

### ड्रिम्झ कलेक्शन
रेडीमेड ब्लाऊज



### शांतीवन
कुष्ठरोग निवारण आश्रमातर्फे उत्पादित वस्तू

### SVRR ताडदेव
दिव्यांग मुलांनी बनविलेली उत्पादने

## श्री सिल्क
कांचीपुरम, कांजीवरम, वेडींग सिल्क सारीज

## द लिटील स्टिच
लहान मुलांचे कपडे

## दिनेह कलेक्शन
कॉटन, इरकली, पुणेरी, इंदुरी साड्या

## दीपाज् युनीक कलेक्शन्स
चंदेरी, कोटा, इटालियन, ड्रेस मटेरिअल

## वृंदा पैठणी
हॅंडलूम, पॉवरलूम, विविध प्रकारच्या पैठणी

## अर्थिता
विविध ऑर्गनायझर्स

## मृणाक्षी लखनवी
कॉटन, मोडाल, चंदेरी, मसलीम लखनवी कुर्तीज

## प्रयोग क्रिएशन्स
हॅण्ड पेंटेड बॅग्ज

## कायरा कलेक्शन
लेगिंग, जॅकेटस, सिल्क कुर्तीज, ड्रेस मटेरिअल

## राजू एम्ब्रॉयडरी
कांथावर्क, मुर्शिदाबाद सिल्क साड्या, कलकत्ता एम्ब्रॉयडरीचे ड्रेस मटेरियल

## कलकत्ता हॅण्ड एम्ब्रॉयडरी
कांथा, एम्ब्रॉयडरी, फुलकारी साड्या व ड्रेस मटेरिअल

## स्वप्नालंकार
मोती पोवळी, पाचू, दागिने !

## पलाश ज्वेलरी
सिल्व्हर व प्रेशियस स्टोन्स ज्वेलरी

## मोहक क्रिएशन
स्त्रिया व मुलींसाठी कुर्तीज

## आशुज कलेक्शन
चंदेरी, बाटिक ड्रेस मटेरिअल

## राधा फॅशन्स
ड्रेस मटेरियल आणि हॅण्ड वर्क कुर्ती मटेरियल

## ओमकार मार्केटींग
हार्ड ॲनोडाइज्ड किचनवेअर्स (बिडाची भांडी)

## स्टेप-इन-वॉक शूज
चप्पलस्, सॅंडल्स, शूज इ.

## शितल बॅग्ज
रेग्झिनने बनवलेल्या मजबूत बॅग, सॅक, प्रवासी बॅग्ज

## विकास लेदर वर्क्स
लेदर पर्सेस, बॅग्ज, लेदर जॅकेट आणि लॅपटॉप बॅग

## कोकोमेलन किड्स वेअर
लहान मुलींचे कपडे

## आरतीज्
